**T.Y.B.A.**
**MARATHI**
**HISTORY OF MARATHI LITERATURE**
**(Paper – IV) (28/12/2018)**

**Code: 98021 / Marathi : Paper IV.**

**वेळ: ३ तास]** **[गुण: १००]**

**सूचना:** १. प्रश्न १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
२. प्रश्न नववा **आवश्यक** आहे.
३. एकुण पाच प्रश्न सोडवा.
४. सर्व प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. महानुभवीय साहित्याची स्वरूप व वैशिष्टये सविस्तर स्पष्ट करा.

२. वारकरी साहित्याच्या वैशिष्टयांचा सोदाहरण आढावा घ्या.

३. 'पंडिती वाङ्मय म्हणजेच पंत वाङ्मयाची मध्ययुगीन साहित्यात वैशिष्टयपूर्ण भूमिका आहे.' विधानाची चर्चा करा.

४. शाहिरी वाङ्मय हेच खरे मऱ्हाटी मातीचे वाङ्मय आहे. – चर्चा करा.

५. प्राचीन मराठी वाडमयातील विविध पंथीय वाङ्मयाच्या स्वरूप वैशिष्ट्यांचा आढावा घ्या.

६. इतर धर्मीय विशेषतः जैन, मुस्लिम आणि ख्रिश्चन साहित्यिकांनी प्राचीन मराठी वाङ्मय समृद्ध केले आहे. – चर्चा करा.

७. मध्ययुगीन मराठी साहित्यातील साहित्यप्रकारांचा परिचय करून द्या.

८. बखर वाङ्मयाची स्वरूपवैशिष्टये सविस्तर स्पष्ट करा.

९. प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा. **(एकूण चार)**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) धवळे | १) म्हाइंभट |
| २) तुकाराम गाथा | २) नामदेव |
| ३) मोरोपंतांचे रामायण | ३) वामनपंडित |
| ४) सभासदी बखर | ४) शेखमहंमद |

********



307EF761CE1F3E0AB132F19C108D8027

T.Y.B.A.
MARATHI
THEORY OF LITERATURE & LITERARY CRITICISM (REV.)
(Paper – V) (31/12/2018)



[वेळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

प्र.१ अ) भरतमुनींचे रससुत्र त्यातील घटकांसह सोदाहरण स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. कुंतकाचा वक्रोक्तिविचार
२. वामनाचा रीतिविचार

प्र.२ अ) ॲरिस्टॉटलच्या अनुकृती सिद्धांताची सविस्तर चर्चा करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. क्षेमेंद्राचा औचित्यविचार
२. रसविघ्ने

प्र.३ अ) शब्दशक्ती म्हणजे काय ते सांगून व्यंजनेचे साहित्यातील महत्त्व साधार स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. रूपक व प्रतिमा
२. मुक्तछंद

प्र.४ अ) 'प्रतिभा हे काव्यनिर्मितीचे जनक कारण आहे.' हे विधान सविस्तर स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. अभ्यास: एक काव्यकारण
२. कल्पनाशक्ती व चमत्कृतीशक्ती

प्र.५ अ) मम्मटाचा काव्यप्रयोजनविचार साधार स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. आत्मविकार: एक काव्यप्रयोजन
२. सामाजिक बांधिलकी

प्र.६ अ) रसास्वादासंदर्भातील अभिनवगुप्ताच्या रसविषयक मताची सविस्तर चर्चा करा. (१२)

**किंवा**



307EF761CE1F3E0AB132F19C10FA2457

आ) टिपा लिहा.

१. ॲरिस्टॉटलचा कॅथार्सिस सिद्धांत

२. रिचर्ड्‌सचा प्रेरणा संतुलनाचा विचार

प्र.७ अ) समीक्षा म्हणजे काय ते सांगून समीक्षेतील 'वाचन' या घटकाचे महत्त्व सविस्तर लिहा. **(१२)**

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. वाङमयीन विशेल्षण

२. समीक्षकाची कार्ये

प्र.८ पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही १६)** **(१६)**

१. भामहाने सांगितलेली काव्याची व्याख्या लिहा.

२. "रीति: आत्मा काव्याह्य" हे सूत्र कोणी मांडले आहे?

३. भरताने रससूत्र कोणत्या ग्रंथात मांडले आहे?

४. भरताने एकूण किती रससंख्या सांगितली आहे?

५. कोलरिजने प्रतिभेचे कोणते दोन प्रकार सांगितले आहेत?

६. कारयित्री प्रतिभा व भावयित्री प्रतिभा असे प्रतिभेचे वर्गीकरण कोणी केले आहे?

७. विभावांचे प्रकार सांगा.

८. प्लेटोने आपली आदर्श राज्याची कल्पना कोणत्या ग्रंथात मांडली आहे?

९. 'काव्य म्हणजे निसर्गाची सर्जनशील अनुकृती होय' असे कोणी म्हंटले आहे?

१०. गौणी लक्षणेचे प्रकार कोणते?

११. आलंबन विभाव म्हणजे काय?

१२. 'औचित्यविचारचर्चा' या ग्रंथाचा कर्ता कोण?

१३. समीक्षेचे कोणतेही तीन टप्पे सांगा.

१४. 'शिवतरक्षतये' म्हणजे काय?

१५. प्रतिभेला 'वेडाची बहीण' कोणी म्हटले आहे?

१६. प्रतिभेचे अलौकिकत्त्व कशात आहे?

१७. प्रीती व कीर्ती ही काव्यप्रयोजने कोणी सांगितली आहेत?

१८. शृंगार रसाचा स्थायीभाव कोणता?

१९. वामनाने सांगितलेले रीतिचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

२०. वाङमयीन विश्लेषण म्हणजे काय?

********



307EF761CE1F3E0AB132F19C10FA2457

T.Y.B.A.

MARATHI

LITERATURE AND SOCIETY (REV.)

(Paper – VI) (02/01/2019)



[वेळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ) साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधाचे स्वरूप स्पष्ट करा. (२५)

**किंवा**

ब) "साहित्यकृतीत समकालीन जीवनाचे विविध संदर्भ परावर्तीत होतात." ह्या विधानाचा परामर्श घ्या.

अ) दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करून बाबुराव बागुल यांच्या 'सूड' ह्या कादंबरीतील जानकी ह्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून समाजातील स्त्रीजीवनवेदनेचा आढावा घ्या. (२५)

**किंवा**

ब) "सूड' ह्या कादंबरीतील सामाजिक प्रश्नांचे तुमच्या शब्दांत विश्लेषण करा.

अ) सानिया यांच्या 'अवकाश' ह्या कादंबरीतून जान्हवीच्या जगण्याची कथा अधोरेखित झाली आहे." हे विधान साधार स्पष्ट करा. (२५)

**किंवा**

ब) "सानिया यांच्या 'अवकाश' कादंबरीतील आशयसूत्रांचे मूल्यमापन करा.

अ) कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' ह्या कादंबरीतून अभिव्यक्त होणाऱ्या ग्रामविश्वाचा परामर्श घ्या. (२५)

**किंवा**

ब) 'गावठाण' कादंबरीतील आनंदीच्या भावविश्वाचा तुमच्या शब्दांत उलगडा करा.

*********

60816

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**HISTORY OF MARATHI LITERATURE**
**(Paper – IV) (08/01/2019)**



**वेळ: ३ तास]** **[गुण: १००]**

**सूचना:** १. प्रश्न १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
२. प्रश्न नववा **आवश्यक** आहे.
३. एकुण पाच प्रश्न सोडवा.
४. सर्व प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. महानुभवीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्या गद्य व पद्य वाङ्मयातून कसा अविष्कृत झाला आहे सोदाहरण सांगा.

२. वारकरी संत साहित्याच्या प्रेरणा सांगून स्वरूप सांगा.

३. पंडिती काव्याचे स्वरूप सांगून पंडिती काव्याच्या गुणदोषाची साधार चर्चा करा.

४. शाहिरी कवितेने मराठी कवितेला लोकजीवनातील अनुभवाच्या अविष्करणातून कसे समृद्ध केले आहे.

५. नाथ, दत्त, समर्थ आणि लिंगायत पंथीयांनी केलेल्या वाङ्मयीन कार्याचा परामर्श घ्या.

६. मराठी साहित्यात इतर धर्मियांनी केलेल्या लेखनाला महत्त्व प्राप्त झाले आहे सोदाहरण पटवून द्या.

७. मध्ययुगीन मराठी साहित्यातील विविध रचनाप्रकारांचा परिचय करून द्या.

८. बखर साहित्याचे स्वरूप सांगून बखरीतून तत्कालीन स्थितीगतीचे चित्रण कसे झाले आहे उलगडून दाखवा.

९. प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा. **(एकूण चार)**

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| १) ऋद्धिपूर चरित्र | १) मुक्ताबाई |
| २) चांगदेव पासष्टी | २) फादरस्टिफन्स |
| ३) समश्लोकी टीका | ३) मोरोपंत |
| ४) आज्ञापत्र | ४) सगनभाऊ |

*********



70BC2C0C91A4FAFC7BD195B46D45C16A

**T.Y.B.A.**

**MARATHI**

**THEORY OF LITERATURE & LITERARY CRITICISM (REV.)**

**(Paper – V) (09/01/2019)**

ळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

प्र.१ अ) भरतमुनींचे रसविषयक सुत्र सविस्तर स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. वक्रोक्तीचे प्रकार
२. अलंकाराचे काव्यातील स्थान

प्र.२ अ) प्लेटोच्या अनुकृती सिद्धांताचे सविस्तर स्पष्टीकरण करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. वामनाच्या रीतिविचारातील अर्थगुण
२. रसविघ्ने

प्र.३ अ) साहित्याची भाषा म्हणून लक्षणाशक्तीचे स्वरूप व प्रकार स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. साहित्याच्या भाषेतील रूपकाचे स्वरूप
२. काव्यातील छंद

प्र.४ अ) प्रतिभा म्हणजे काय? साहित्यनिर्मितीप्रक्रियेतील प्रतिभेचे स्वरूप विशद करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. कोलरिजची प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती
२. अभ्यास: एक काव्यकारण

प्र.५ अ) भारतीय साहित्यशास्त्रातील संस्कृत साहित्यतज्ञांनी सांगितलेल्या काव्यप्रयोजनांची चर्चा करा. (१२)

**किंवा**

आ) टिपा लिहा.
१. सामाजिक बांधिलकी
२. भरतमुनी व जगन्नाथ पंडितांची काव्यप्रयोजने

प्र.६ अ) रसप्रक्रियेच्या संदर्भात अभिनवगुप्त यांनी केलेले विवेचन सविस्तर सांगा. (१२)

**किंवा**



70BC2C0C91A4FAFC7BD195B46DB19970

आ) टिपा लिहा.

१. कॅथार्सिस एक विरेचनवादी भूमिका

२. भट्टलोल्लटाची रसविषयक उपपत्ती

प्र.७ अ) साहित्यसमीक्षेतील विविध घटकांचा परिचय करून द्या. **(१२)**

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१. साहित्य समीक्षेचे कार्य थोडक्यात लिहा.

२. वाङमयीन निकष

प्र.८ पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही १६)** **(१६)**

१. 'काव्यंम् ग्राह्यम् अलंकारात | सौंदर्यम अलंकार |' ही व्याख्या कोणी सांगितली आहे?

२. उत्प्रेक्षा म्हणजे काय?

३. 'ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे' असे कोणी म्हटले आहे?

४. 'रसगंगाधर' या ग्रंथाचा निर्माता कोण?

५. विभावाचे प्रकार सांगा.

६. व्यंजनेचे मुख्य प्रकार सांगा.

७. भावना विरेचनाचा सिद्धांत कोणी मांडला?

८. अभिधा म्हणजे काय?

९. कोणतीही दोन रसविघ्ने लिहा.

१०. भरतमुनींच्या प्रसिद्ध ग्रंथाचे नाव सांगा.

११. 'संभावनाविरह' म्हणजे काय?

१२. 'कॅथार्सिस' ही संकल्पना कोणी मांडली?

१३. अनुभाव म्हणजे काय?

१४. समीक्षा व्यापारातील पहिली पायरी कोणती?

१५. श्रीशंकुकाने कोणता सिद्धांत मांडला?

१६. ॲरिस्टॉटलच्या साहित्यविषयक ग्रंथाचे नाव लिहा.

१७. 'अभिनवभारती' ह्या ग्रंथाचा लेखक कोण?

१८. 'सद्य:पर निर्वतये' म्हणजे काय?

१९. कोणतेही दोन स्थायीभाव सांगा.

२०. क्षेमेंद्राच्या कोणत्याही एका ग्रंथाचे नाव लिहा.

********



70BC2C0C91A4FAFC7BD195B46DB19970

T.Y.B.A.
MARATHI
LITERATURE AND SOCIETY (REV.)
(Paper – VI) (10/01/2019)

[वेळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ) 'संस्कृती' ह्या घटकाच्या अनुषंगाने साहित्य आणि समाज ह्या संकल्पना स्पष्ट करा. (२५)

**किंवा**

ब) साहित्यकृतीचा अभ्यास करण्यासाठी समकालीन संदर्भ कसे महत्त्वाचे ठरतात ते विश्लेषित करा.

अ) दलित साहित्याची वैशिष्टये सांगून बाबुराव बागुल यांच्या 'सूड' ह्या कादंबरीतील ज्वलंत समाजवास्तवाची चिकित्सा करा. (२५)

**किंवा**

ब) "सूड' ह्या कादंबरीतील 'जानकी' ह्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून बाबुराव बागुल यांनी समाजातील स्त्रीजीवनवेदना अभिव्यक्त केळी आहे." ह्या विधानाचा परामर्श घ्या.

अ) सानिया यांच्या 'अवकाश' ह्या कादंबरीतून अभिव्यक्त झालेली स्त्रीच्या जगण्याची व्यथा तुमच्या शब्दांत लिहा. (२५)

**किंवा**

ब) "सानिया यांच्या 'अवकाश' कादंबरीतील कथासूत्रांमधून सामाजिक प्रश्नांची अभिव्यक्ति होते" ह्या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

अ) कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' ह्या कादंबरीतून येणारे ग्रामीण जीवनाचे संदर्भ उलगडून दाखवा. (२५)

**किंवा**

ब) 'गावठाण' कादंबरीत येणाऱ्या विविध गावठाणांच्या तुमच्या शब्दांत आढावा घ्या.

*********



83DB99DA67FEBBE7D97A1C6B3A2BB0C2

T.Y.B.A.
MARATHI
INTRODUCTION TO LINGUISTICS & OUTLINE OF MARATHI GRAMMAR
(Paper – VII) (JAN-2019)

[वेळ: ३ तास] [गुण: १००]

सूचना: १) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ. मानवी भाषा व मानवेत्तर प्राण्यांची भाषा यांच्यातील फरक स्पष्ट करून मानवी भाषेची लक्षणे स्पष्ट करा.

**किंवा**

ब. ऐतिहासिक भाषाविज्ञान संकल्पना व वैशिष्टये (मूलतत्त्वे) स्पष्ट करा.

प्र.२ अ. स्वनपरिवर्तनाची प्रक्रिया स्पष्ट करून स्वनपरिवर्तनाच्या विविध कारणांचा परामर्श घ्या.

**किंवा**

ब. भाषेतील अर्थ ही संकल्पना स्पष्ट करून अर्थपरिवर्तनाच्या प्रकारांचे सोदाहरण विवेचन करा.

प्र.३ अ. शब्दजातींचे पारंपरिक वर्गीकरण स्पष्ट करून क्रियाविशेषण या शब्दजातींची सविस्तर मांडणी करा.

**किंवा**

ब. प्रयोग म्हणजे काय ते सांगून कर्मणी प्रयोगाच्या विविध प्रकारांचे सोदाहरण विवेचन करा.

प्र.४ अ. विभक्ती संकल्पना स्पष्ट करून षष्ठी विभक्तीच्या वादाचा परमर्श घ्या.

**किंवा**

ब. शब्दसिद्धी संकल्पना स्पष्ट करून शब्दसिद्धीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

प्र.५ (अ) खालीलपैकी **कोणत्याही दोहोंवर** टिपा लिहा.

१. ऐतिहासिक भाषाविज्ञानाची साधने
२. स्वन, स्वनिम व स्वनांतरे फरक
३. रुपिम व रुपिकात्तरे संकल्पना फरक
४. रुपांतरादान

(ब) खालीलपैकी **कोणत्याही दोहोंवर** टिपा लिहा.

१. उभयान्वयी अव्यये
२. कर्मभाव खंकर
३. शून्य प्रत्यय
४. मराठी भाषेची लिंगव्यवस्था

*********

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**THE STUDY OF AN AUTHOR (REV)**
**(Paper – VIII) (JAN-2019)**

[वेळ: ३ तास] [ एकुण गुण: १००]

**Please check whether you have got the right question paper.**

**सुचना:** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ) लेखकाभ्यास म्हणजे काय ते सांगून लेखाभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव लेखाभ्यासामध्ये करावा लागतो ते स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब) लेखकाभ्यास ही संकल्पना स्पष्ट करून लेखाकाभ्यासाची आवश्यकता का असते? त्याची सविस्तर चर्चा लिहा.

प्र.२ अ) मानवी मनाचा मानसिक आणि शारीरिक कोंडमारा जयवंत दळवींच्या कथांतून कसा प्रत्ययास येतो वेचक जयवंत दळवी या कथासंग्रहाधारे स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब) जयवंत दळवींच्या कथांतून वेडेपणा, लैंगिक आवेग, मौन, आध्यात्माकडे झुकणारी मनोवृत्ती याचे दर्शन कसे घडते? ते 'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहाधारे स्पष्ट करा.

प्र.३ अ) "अंधाराच्या पारंब्या" या कादंबरीच्या शीर्षकाची यथार्थता सोदाहरण स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब) विसाव्या शतकाच्या प्रारंभ काळातील गौड सारस्वत ब्राम्हण विधवा स्त्रियांच्या व्यथा 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीमध्ये कशा व्यक्त झाल्या आहेत ते स्पष्ट करा.

प्र.४ अ) 'सारे प्रवासी घडीचे' पुस्तकामध्ये 'दक्षिण कोकणातील व्यक्ती आणि समाज यांचा अनोखा चित्रपट जयवंत दळवी उभा केला आहे.' या विधानाची चर्चा करा. २०

**किंवा**

ब) "हसता हसता अंतर्मुख करणारे एक पुस्तक म्हणजे 'सारे प्रवासी घडीचे हे पुस्तक होय."' या विधानाची सत्यता सोदाहरण स्पष्ट करा.

प्र.५ अ) 'संध्याछाया' नाटकातील संघर्षाची विविध रूपे सोदाहरण स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब) नोकरीच्या निमित्ताने परदेशात वास्तव्य करणारी तरुण पिढी व गावाकडे राहणारे वृद्ध माता-पिता यांच्या नाते संबंधातल्या ताणाचे रेखाटन 'संध्याछाया' या नाटकामध्ये जयवंत दळवी यांनी कसे केले आहे ते स्पष्ट करा.

*************



8106B8780CCB67237AB39F5E58BBAAC2

**T.Y.B.A.**

**MARATHI**

**TRANSLATION LITERARY ESSAY & PROJECT**

**(Paper – IX) (JAN-2019)**

[For Regular Students : $2\frac{1}{2}$ तास | [ Marks:८०/१००]

For IDOL students : 3 तास]

Please check whether you have got the right question paper.

सूचना: १) दूरस्थ शिक्षण संस्थेच्या (IDE) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० आहेत.

प्र. १ अ) भाषांतर, रुपांतर, अनुवाद व अर्वाचीनीकरण या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

आ) भाषांतराची विविध क्षेत्रातील उपयुक्तता सविस्तर स्पष्ट करा.

प्र. २ अ) ललित साहित्याचे भाषांतर करताना ‘शैली’ हा घटक आव्हान ठरतो, कसे ते सविस्तर लिहा. (१५)

**किंवा**

आ) ललित साहित्यकृतींच्या भाषांतरप्रक्रियेत सांस्कृतिक संदर्भाचे मान कितपत आवश्यक ठरते, ते सोदाहरण स्पष्ट करा.

प्र. ३ पुढीलपैकी इंग्रजीत एक, हिंदीतील एक आणि मध्ययुगीन मराठी गद्यांपैकी एक असा एकूण तीन उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा.

अ) Education is the act of learning things around us. It helps us to easily understand and deal with any problem and makes balance throughout the whole life in every aspect. Education is the first and foremost rights of every human being. Without education we are incomplete and our lives are useless. Education helps us to set a goal and go ahead by working on that throughout the life. It improves our knowledge, skill, confidence level and personality. It empowers us intellectually to interact with other in our life. Education brings maturity and teaches us to live in society with changing environment. It is the way to social development, economic growth and technological development.

**किंवा**

ब) Mahatma Gandhi is called as mahatma because of his great works and greatness all through the life. He Was a great freedom fighter and non-violent activist who always followed non-violence all though his life while leading India for the independence from British rule. He was born on 2nd of October in 1869 at Porbandar in Gujarat, India. He was just 18 years old while studying law in the England. Later he went to British colony of South Africa to practice his law where he got differentiated from the light skin people because of being a dark skin person. That’s why he decided to became a political activist in order to do so some positive changes in such unfair laws.



D01A7394B3FF066DD8AF4FC6B2BC9999

क) भारतीय संविधान के प्रावधान के अनुसार, पुरुषों की तरह सभी क्षेत्रों में महिलाओं को बराबर अधिकार देने के लिये क़ानूनी स्थिति है | भारत में बच्चों और महिलाओं के उचित विकास के लिये इस क्षेत्र में महिला और बाल विकास विभाग अच्छे से कार्य कर रहा है | प्राचीन समय से ही भारत में महिलाएँ अग्रणी भूमिका में थी हालाँकि उन्हें हर क्षेत्र में हस्तक्षेप की इजाजत नहीं थी | अपने विकास और वृद्धि के लिये उन्हें हर पल मजबूत, जागरुक और चौकन्ना रहने की जरूरत है | विकास का मुख्य उद्देश्य महिलाओं को समर्थ बनाना है क्योंकि एक सशक्त महिला अपने बच्चों के भविष्य को बनाने के साथ ही देश का भविष्य का सुनिश्चित करती है | विकास की मुख्यधारा में महिलाओं को लाने के लिये भारतीय सरकार के द्वारा कई योजनाओं को निरुपित किया गया है | पुरे देश की जनसंख्या में महिलाओं की भागीदारी आधे की है और महिलाओं और बच्चों के सर्वांगीण विकास के लिये हर क्षेत्र में इन्हे स्वतंत्रता की जरूरत है |

**किंवा**

ड) समय धन भी ज्यादा कीमती है; क्योंकि यदि धन को खर्च कर दिया जाए तो यह वापस प्राप्त किया जा सकता है हालांकि, यदि हम एक बार समय को गंवा देते है, तो इसे वापस प्राप्त नहीं कर सकते है | समय के बारे में एक सामान्य कहावत है कि, "समय और ज्वार-भाटा कभी किसी की प्रतीक्षा नहीं करते हैं |" यह बिल्कुल पृथ्वी पर जीवन के अस्तित्व की तरह से यह कहावत भी बिल्कुल सत्य है | समय बिना किसी रुकावट के निरंतर चलता रहता है | यह कभी किसी की प्रतिक्षा नहीं करता है | इसलिए, हमें जीवन के किसी भी दौर में कभी भी अपने कीमती समय को बिना किसी उद्देश्य और अर्थ के व्यर्थ नहीं करना चाहिए | हमें हमेशा समय के अर्थ को समझना चाहिए और उसी के अनुसार, इसे सकारात्मक ढंग से कुछ उद्देश्यों की पूर्ति के लिए इसका प्रयोग करना चाहिए |

इ) गोसावी गावां एक बीजें करीत असति: तेथीचेनि लोकें वारिलें: 'देव व्हो: या वाटा न वचा " न वचा : एथ अरणम्हैसा असे : तो माणुसें मारी': आइकोनी बीजें केलें : ते मार्गी चालतां वाणी पडली आणि म्हैसा आला : गोसावी अवलोकीला : आणि तेयाचा रोखु निवर्तला : बीजें केलें : तीये दिउनि तो मार्गु वसता जाला ||

**किंवा**

ई) पुर स्वीकरले : वास पाहो लागले : आवघेयांही हरीखु जाला : 'कुमरू जीयाला : कुमरू जीयाला' मग गोसावी नगदा मध्ये बीजें केलें : कमळा-आइसासी सेस भरिली : गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकारिले : गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळ ही आण: जोप्यांचे व्यसन : राणियेचा पढीयावो : हरिपाळ नाव : प्रथान कुशळू : तेते दरे दरकुटे सोधविले : पुरुषे उठविले : म्हणौनि : आपुलीये राणिए करवि पुसविले : कमळाइसाते : विहरणीचीया खुणा तीही अधिलीचि संघातलीया : अनारीसीया नाही : ||

**प्र. ४** पुढीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर निंबंध लिहा. (२०)

(दूरस्थ शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पुढीलपैकी कोणतेही दोन निंबंध लिहावेत ) (गुण ४०)

अ) सामाजिक चळवळी आणि साठोत्तरी साहित्यप्रवाह

ब) उच्चशिक्षण आणि मराठी भाषा

क) साहित्यसंमेलन आणि वाद

ड) वाचनसंस्कृतीचा ऱ्हास होतो आहे काय ?

इ) जागतिकीकरण आणि मराठी भाषा

*********



D01A7394B3FF066DD8AF4FC6B2BC9999